परिशिष्ट - २९


# सिंबायोसिस

डॉ. शां.ब. मुजुमदार एम.एस्सी, पी.एच् डी.
अध्यक्ष आणि संस्थापक संचालक
भारताचे राष्ट्रपती यांचेकडून 'पद्मश्री'ने सन्मानीत

सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००४ (भारत)
फोन : ऑफिस : ०२०-२५६५२४४४
घर : २५६५१३८१ टेलिफॅक्स : ०२०-२५६५९२०९
e-mail : sbmujumdar@vsnl.net
Website : www.symbiosissociety.org


॥ वसुधैव कुटुम्बकम् ॥

एस/४४/६४२
१९ फेब्रुवारी २०१०

प्रति,
श्री. संजय कुमार पाठक
वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे यांचे कार्यालय
पुणे - ४११ ००४

संदर्भ - आपले जा. क्र. कक्ष-६/जमीन/३९६४/२००९-१० दि. २५/१/२०१० चे पत्र.

विषय - आपल्या उपरोक्त संदर्भांकीत पत्रानुसार आमचे महाविद्यालयात एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी (वर्ष २००५-२००७) शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची माहीती कळविणेबाबत.

महोदय,

आपले उपरोक्त संदर्भांकीत पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,

१) सिंबायोसिस इन्स्टिटयुट ऑफ बिजनेस मॅनेजमेंट मध्ये एम.बी.ए. अभ्यासक्रम वर्ष २००६-२००८ साठी श्री. राजेंद्र मंगरूळकर, तत्कालीन सहसचिव (वने) महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई यांची मुलगी कु. नेहा राजेंद्र मंगरूळकर, स्नॅप आय. डी. क्र. ५४८९७२ हिला व्यवस्थापन कोटयातून प्रवेश देण्यात आलेला होता. सिंबायोसिस संस्थेत व्यवस्थापन कोटयातील प्रवेशाबाबत कोणत्याही प्रकारचे 'डोनेशन' आकारले जात नाही. सदर विद्यार्थीनीने नियमानुसारची फी बँकेत जमा केलेली आहे.

२) श्री. बी. के. सिंग, तत्कालीन प्रधान मुख्य वन संरक्षक, म. रा. नागपूर यांचे मुलगा / मुलगी यांना प्रवेश देताना गुणवत्ते नुसार अथवा व्यवस्थापन कोटा या पैकी कोणत्या निकषावर देण्यात आलेला आहे या संदर्भात माहितीची विचारणा आपल्या पत्रात केली आहे, परंतू फक्त श्री. बी. के. सिंग या नावावरून एखादया प्रवेशा बाबत तपशील देणे (नाव व शाखेबाबत अपूर्ण माहिती असल्याने) शक्य होत नाही.

३) सदर पत्रामध्ये इतर तीन विद्यार्थ्यांबाबत केवळ उल्लेख आहे परंतू त्या विद्यार्थ्यांची नावे, कॉलेज व इतर अधिक माहिती दिली नसल्याने त्यांची माहिती देणे शक्य नाही.

तरी अधिक सविस्तर माहिती (अनुक्रमांक २ व ३ मधील विद्यार्थ्यांची संपूर्ण नावे, कॉलेज व इतर अधिक माहिती) दिल्यास आपणांस त्यांचे बाबतची माहिती देणे शक्य होईल.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. शां. ब. मुजुमदार)